# चौथी मतदारसंघ पुनर्रचना व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवडणुकीय राजकारण

**लक्ष्मण दादासो भोगम** राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये निवडणूक ही प्रक्रिया अनिवार्य असते. संसदेतील कार्यपालिका ही कायदेमंडळाला जबाबदार राहून कार्य करत असते. कायदेमंडळाचे सदस्य प्रत्यक्ष मतदान पध्दतीने निवडून येतात. भारतात केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींची निवड लोकशाही पध्दतीने होत असून, यावर मतदारांच्या आशाआकांक्षांचा प्रभाव दिसून येतो. या निवडणूक प्रक्रियेमध्ये राजकीय पक्ष आपले अस्तित्व आजमावताना दिसतात. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेमध्ये सार्वत्रिक निवडणुका या महत्त्वाच्या ठरतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक प्रक्रिया ही राजकीय गतिमानतेचे मुख्य रूप असते. कारण, या निवडणुकांमधूनच जनसामान्यांच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब प्रतित होत असते. भारतीय राज्यघटनेमध्ये ३२४ व्या कलमान्वये निवडणुक आयोगाची तरतूद केलेली असून, निवडणुक आयोगाच्या नियंत्रणाखाली निवडणुका घेतल्या जातात. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९, २००४, २००९ व २०१४ अशा विधानसभेच्या एकूण बारा निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये अनेक सत्ताबदल झाले. १९६२ ते १९९० च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत काही अपवाद वगळता महाराष्ट्रावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. म्हणूनच महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाला 'काँग्रेस व्यवस्था' असे संबोधले जाते.

महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेमध्ये पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व मुंबईसह कोकण असे राजकीय विभाग पडतात. यामध्ये विधानसभा मतदारसंघांचा विचार केला असता पश्चिम महाराष्ट्रात ७०, उत्तर महाराष्ट्र ३५, विदर्भ ६२, मराठवाडा ४६, व मुंबईसह कोकण ७५ असे एकूण २८८ विधानसभा मतदारसंघ संख्या दिसून येते. यामध्ये मुंबईसह कोकणाचा विचार केला असता शहरी कोकण व तळकोकण अशी विभागणी करावी लागेल. तळकोकणामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांचा समावेश होतो.

चौथ्या परिसिमन आयोगापर्यंतच्या मतदारसंघ पुनर्रचनेपर्यंत तळकोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग ह्या दोन जिल्हयांमध्ये दोन लोकसभा व अकरा विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात होते. चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर तळकोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांमध्ये एक लोकसभा व आठ विधानसभा मतदारसंघ दिसून येतात. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या सावंतवाडी, मालवण व कणकवली या तीन विधानसभा मतदारसंघांचा निवडणुकनिहाय आढावा पुढील प्रमाणे.

**सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ**

तक्ता क्र. १

२००९ –२०१४ सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीय राजकारण

| अ. क्र | निवडणुक वर्ष | विजयी उमेदवार | पक्ष | मते | पराभूत उमेदवार | पक्ष | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९ | दीपक केसरकर | राष्ट्रवादी काँग्रेस | ६३४३० | शिवराम दळवी | शिवसेना | ४५०१२ |
| २ | २०१४ | दीपक केसरकर | शिवसेना | ७०९०२ | राजन तेली | भाजपा | २९७१० |

**स्त्रोत**:www.eci.gov.in

तक्ता क्र. १ वरुन असे दिसून येते की, सावंतवाडी विधानसभा मतदारसंघात २००९ ते २०१४ या कालावधीत झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या राजकीय पक्षांचे वर्चस्व राहीलेले आहे. चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार सावंतवाडी विधानसभा मतदारसंघामध्ये सावंतवाडी व दोडामार्ग या दोन तालुक्यांबरोबरच वेंगुर्ला तालुक्याचा नव्याने समावेश करण्यात आला. या बदलेल्या मतदारसंघ रचनेनुसार झालेल्या निवडणुकीत सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे दिपक केसरकर यांनी ६३३४० (४८.२८ टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. शिवसेनेचे शिवराम दळवी यांना ४५०१२ (३४.२६ टक्के) मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार प्रविण भोसले यांना १९३६४ (१४.७४ टक्के) मते मिळाली.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत सावंतवाडी विधनसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे जाण्याचे कारण असे की, सावंतवाडी मतदारसंघातून सलग १० वर्षे आमदार असणाऱ्या शिवराम दळवी यांच्याबद्दल मतदारसंघातील मतदारांमध्ये व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी होती. मतदारसंघातील प्रकल्पांचे प्रलंबित असणारे प्रश्न, दुर्गम भागातील वाडयांवर प्राथमिक सेवा–सुविधांचा असणारा अभाव यामुळे दुर्गम भागातील मतदारांमध्ये शिवराम दळवी यांच्याबद्दल व्यक्तिगत स्वरुपाची नाराजी होती. त्याचबरोबर, सदर विधानसभा निवडणुकीतील प्रचारसभांमध्ये सावंतवाडी मतदारसंघातील औष्णिक व मायनिंग प्रकल्पांचा मुद्दा प्रमुख होता. यामध्ये प्रविण भोसले यांनी सुरवातीपासूनच औष्णिक–मायनिंग प्रकल्पाला विरोध केला, तर दिपक केसरकर यांनी औष्णिक–मायनिंग प्रकल्पाचे समर्थन केले. त्यामुळे सदर प्रकल्पास विरोध करणाऱ्या जनसमुदायाने प्रविण भोसले यांना पाठींबा दिला, तर प्रकल्पाचे समर्थन करणाऱ्या व प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या हजारो कामगारांनी दीपक केसरकर यांना पाठींबा दिला. नारायण राणे यांनी दीपक केसरकर यांच्या प्रचारार्थ संपूर्ण मतदारसंघामध्ये प्रचार सभा घेतल्या. दीपक केसरकर यांचे सावंतवाडी शहराच्या नगरपालिकेच्या राजकारणावर असणारे प्रभुत्व व दीपक केसरकर यांनी सावंतवाडीचे नगराध्यक्ष असताना केलेली लोकाभिमुख विकासकामे यांचा लाभ दीपक केसरकर यांना झाला. तसेच, सावंतवाडी व दोडामार्ग

तालुक्यातील ग्रामीण भागातील मराठा मतांची विभागणी सुरेश दळवी व प्रविण भोसले यांच्यामध्ये झाली. त्यामुळे सदर मतदारसंघात १९६२ च्या स्थापनेनंतर प्रथमच मराठेत्तर उमेदवार विजयी झाला. या सर्व आधारांवर राष्ट्रवादीचे दीपक केसरकर यांनी शिवसेनेचे शिवराम दळवी यांचा १८४१८ इतक्या मताधिक्याने पराभव करत सावंतवाडी विधानसभा मतदारसंघावर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व प्रस्थापित केले.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सावंतवाडी विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार दीपक केसरकर यांनी ७०९०२ (४८.६० टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. भाजपाचे राजन तेली यांना २९७१० (२०.३७ टक्के) मते मिळाली. काँग्रेसचे चंद्रकांत गावडे यांना २५३७६ (१७.४० टक्के) मते मिळाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ शिवसेना पक्षाकडे जाण्याचे व राष्ट्रवादी काँग्रेसमधून पक्षांतर करुनदेखील दीपक केसरकर हे विजयी होण्याचे कारण असे की, दीपक केसरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात नारायण राणे यांच्याविरोधी असणाऱ्या लाटेचे नेतृत्व केलेले होते. त्यामुळे, वैयक्तिगत नारायण राणे यांना विरोध करणारे सर्व गट व राजकीय पक्ष दीपक केसरकर यांच्या पाठिशी राहिले. नारायण राणे यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे व काँग्रेसमधील नारायण राणे यांच्या वाढत्या वर्चस्वामुळे नाराज झालेले काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते सदर निवडणुकीमध्ये दीपक केसरकर यांच्यासोबत राहिले. दीपक केसरकर यांनी आघाडी सरकारच्या काळात सावंतवाडी विधानसभा मतदारसंघात रस्त्यांचे डांबरीकरण, नळपाणी योजना, बांदा– वाफोली येथे अवजड अर्थमुव्हींग कारखान्याची निर्मिती इत्यादी स्वरुपाची केलेली विकासकामे यामुळे सावंतवाडी मतदारसंघात २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेचे दिपक केसरकर यांनी भाजपाचे राजन तेली यांचा ४११९२ इतक्या मताधिक्याने पराभव करत विजय संपादन केला.

**मालवण– कणकवली विधानसभा मतदारसंघ**

तक्ता क्र. २

२००९ –२०१४ मालवण–कणकवली विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीय राजकारण

| अ.क्र. | निवडणुक वर्ष | विजयी उमेदवार | पक्ष | मते | पराभूत उमेदवार | पक्ष | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९ | नारायण राणे | काँग्रेस | ७१९२१ | वैभव नाईक | शिवसेना | ४७६६६ |
| २ | २०१४ | वैभव नाईक | शिवसेना | ७०५८२ | नारायण राणे | काँग्रेस | ६०२०६ |

**स्त्रोत**:www.eci.gov.in

तक्ता क्र. २ वरुन असे दिसून येते की, मालवण–कणकवली विधानसभा मतदारसंघात २००९ ते २०१४ या कालावधीत झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व शिवसेना पक्षांचे वर्चस्व राहिलेले आहे. चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार जुन्या मालवण–कणकवली विधानसभा मतदारसंघामधून कणकवली तालुका वगळूण्यात आला. नवीन मतदारसंघ पुनर्रचनेनुसार मालवण–कुडाळ विधानसभा मतदारसंघात मालवण तालुक्यासह कुडाळ तालुक्याचा समावेश करण्यात आला. त्यामुळे २००९ नंतर जुना मालवण–कणकवली विधानसभा मतदारसंघ 'मालवण–कुडाळ' या नवीन नावाने ओळखला जाऊ लागला. २००४ साली शिवसेनेच्या नेतृत्त्वामध्ये पक्षांतर्गत वर्चस्ववादाची स्पर्धा निर्माण होऊन उध्दव ठाकरे व नारायण राणे यांच्यामध्ये वैमनस्य निर्माण झाले. या वादातूनच नारायण राणे यांनी शिवसेना पक्षाचा त्याग करत काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. या बदललेल्या रचनेनुसार झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे नारायण राणे यांनी ७१९२१ (५७. ७८ टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. शिवसेनेचे वैभव नाईक यांना ४७६६६ (३८.३० टक्के) मते मिळाली.

चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर झालेल्या या पहिल्या विधानसभा निवडणुकीत सदर मतदासंघ काँग्रेस पक्षाकडे जाण्याचे कारण असे की, मतदारसंघ पुनर्रचनेनुसार मालवण–कुडाळ विधानसभा मतदारसंघामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या मालवण तालुक्यामध्ये १९९० पासून नारायण राणे यांचे राजकीय प्रभुत्व होते. तर सदर विधानसभा मतदारसंघामध्ये नव्याने समाविष्ठ केलेल्या कुडाळ तालुक्याच्या राजकारणावर नारायण राणे यांचे समर्थक शंकर कांबळी यांचे राजकीय प्रभुत्व होते. त्यामुळेच मतदारसंघ पुनर्रचनेनंतर नव्याने समाविष्ठ झालेल्या कुडाळ तालुक्यामधून नारायण राणे यांना १३२०३ इतक्या मतांची आघाडी मिळाली. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांनी औष्णिक–मायनिंग प्रकल्प, टाळंबा प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न उपस्थित करुन, 'मालवण–कुडाळ मतदारसंघासह तळकोकणाच्या औद्योगिक अधोगतीस व मागासलेपणास नारायण राणे यांचे अकार्यक्षम नेतृत्व जबाबदार आहे' असा आरोप केला. परंतु नारायण राणे यांनी स्वतः मुख्यमंत्री असताना केलेली विविध विकासकामे व त्यानंतर आघाडी सरकारच्या कालावधीत उद्योगमंत्री असताना केलेली विकासकामे, औद्योगिक वसाहतीमधील अनेक उद्योगांना राज्य सरकारच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करुन दिल्यामुळे नारायण राणे यांना मतदारांनी पाठिंबा दिला.

सदर निवडणुकीत कुडाळ तालुक्यापेक्षा मालवण तालुक्यामध्ये नारायण राणे यांना कमी मताधिक्य मिळण्याचे कारण असे की, काँग्रेस पक्षाचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते व नारायण राणे यांचे समर्थक या दोहोंमध्ये मतभेद निर्माण झाले होते. नारायण राणे यांच्या आक्रमक व स्पष्टवक्तेपणा असणाऱ्या स्वभावामुळे स्थानिक पातळीवरील काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांमध्ये नारायण राणे यांच्याबद्दल पक्षांतर्गत छुपी नाराजी होती. निवडणूकीच्या दरम्यान शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची अज्ञात व्यक्तींनी अपहरणे केली. तसेच शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी पिस्तुल रोखल्याचे प्रकरण घडले. वैभव नाईक यांनी सदर अपहरणे व पिस्तुल रोखल्याचे कृत्य नारायण राणे यांच्या समर्थकांनीच केले आहे असा आरोप करत, नारायण राणे हे गुंडगीरी व दडपशाहीच्या मार्गाने निवडणूका लढत आहेत असा थेट आरोप केला. यामुळे मालवण तालुक्यामध्ये वैभव नाईक यांना थोडयाफार प्रमाणात सहानुभूती

मिळाली. परंतु काँग्रेसचे उमेदवार नारायण राणे यांची मतदारसंघावर मजबूत पकड होती. विविध विकासकामे, वैयक्तिक जनसंपर्क कार्यकर्त्यांचे संघटन, नारायण राणे यांच्या आक्रमक नेतृत्वाचा प्रभाव यांच्या जोरावर काँग्रेसचे उमेदवार नारायण राणे यांनी शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांचा २४२५५ इतक्या मताधिक्क्याने पराभव करत मालवण—कणकवली विधानसभा मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व निर्माण केले.

२०१४ ची मालवण—कुडाळ विधानसभा मतदारसंघाची निवडणूक तळकोकणाच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत तळकोकणातील प्रमुख राजकीय नेतृत्व असणाऱ्या माजी मुख्यमंत्री व तत्कालीन उद्योगमंत्री नारायण राणे यांचा धक्कादायक पराभव झाला. शिवसेनेचे वैभव नाईक यांनी ७०५८२ (५०.०३ टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. काँग्रेसचे नारायण राणे यांना ६०२०६ (४२.६८ टक्के) मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे पुष्पसेन सावंत यांना २६९२ (१.९१ टक्के) मते मिळाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत मालवण—कुडाळ विधानसभा मतदारसंघामध्ये नारायण राणे या तळकोकणातील प्रमुख राजकीय नेत्यांचा धक्कादायक पराभव झाला. या धक्कादायक पराभवास मे २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीची पार्श्वभूमी होती. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मालवण—कुडाळ विधानसभा मतदारसंघातील नारायण राणे यांचे निकटचे सहकारी व जुन्या वेंगुर्ला—कुडाळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शंकर कांबळी, माजी आमदार राजन तेली, श्रीकांत सरमळकर, जयंत परब, सतिश सावंत, गौरीशंकर खोत, संजय पडते, काका कुडाळकर या प्रमुख नेत्यांनी नारायण राणे यांच्याशी फारकत घेत शिवसेना व भाजपा या पक्षांमध्ये प्रवेश केला. त्याचबरोबर, गतलोकसभा निवडणुकीत सिंधुदुर्ग जिल्हा पातळीवरील राजकारणामध्ये नारायण राणे यांच्यासोबत असणाऱ्या आमदार दीपक केसरकर आणि पुष्पसेन सावंत यांनी नारायण राणे यांचे चिरंजीव डॉ. निलेश राणे यांच्या विरोधात आक्रमक प्रचार केला. दीपक केसरकर यांनी तर 'नारायणे राणे यांची घराणेशाही व गुंडगीरी नष्ट करा' अशाप्रकारचे मतदारांना आव्हान केले. त्यामुळे एकाकी पडलेल्या नारायण राणे गटाला लोकसभा निवडणुकीत मोठया पराभवास सामोरे जावे लागले. लोकसभा निवडणुकीत डॉ. निलेश राणे यांचा पराभव झाल्यामुळे नारायण राणे यांच्या गटामध्ये नाराजी होती. तसेच लोकसभा निवडणुकीत एकत्र आलेल्या नारायण राणे यांच्या विरोधकांनी विधानसभा निवडणुकीतही नारायण राणे यांच्या विरोधात एकजूट दाखविली. नारायण राणे यांच्या वर्चस्ववादी राजकारणास आमदार दीपक केसरकर, आमदार भास्करराव जाधव, माजी आमदार शंकर कांबळी, माजी आमदार पुष्पसेन सावंत, माजी आमदार राजन तेली, श्रीकांत सरमळकर, जयंत परब, सतिश सावंत, गौरीशंकर खोत, संजय पडते, काका कुडाळकर या प्रमुख नेत्यांनी विरोध केला. त्याचबरोबर, सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेसमध्ये दोन गट निर्माण होऊन सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेस या दोन गटांमध्ये विभागली गेली. यामध्ये काँग्रेसच्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा गट आणि नारायण राणे यांच्या कार्यकर्त्यांचा गट अशी विभागणी झाली. सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेसमधील जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नारायण राणे यांच्या दोन्ही सुपुत्रांच्याबद्दल मोठया प्रमाणात नाराजी व असंतोष होता. त्यामुळे काँग्रेसच्या दुसऱ्या फळीच्या अनेक नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला साथ दिली. नारायण राणे यांनी आघाडी सरकारच्या कारकीर्दीत मतदारसंघातील रस्ते विकास, पाणी, पुलांची उभारणी, शैक्षणिक सुविधा आणि आरोग्याच्या सुविधा यासाठी पुष्कळ विकासनिधी आणला. परंतु संबंधित विकासकामे ज्या ठेकेदार किंवा कंत्राटदारांकडून करुन घेण्यात आली, त्यांनी विकासकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ठ ठेवला. त्यामुळे शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांनी नारायण राणे यांच्यावर सातत्याने आरोप केले की, नारायण राणे यांचे कंत्राटदार किंवा ठेकेदारांशी हितसंबंध आहेत व नारायण राणे कंत्राटदारांना अभय देतात. त्यामुळे निकृष्ठ दर्जाच्या विकासकामांचा सारा रोष नारायण राणे यांच्या व्यक्तिगत राजकारणावर आला. शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक यांनी निवडणूक प्रचारादरम्यान टाळंबा धरण प्रकल्प व प्रकल्पग्रस्थांचे प्रश्न, सी वर्ल्ड प्रकल्पाला जनतेचा असणारा विरोध, MIDC च्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न, परराज्यातील पर्सनेट व्यावसायिक व स्थानिक मच्छिमार यांच्यामध्ये असणारा व्यापारी संघर्ष, प्रलंबित ओरोस IT पार्क आणि प्रलंबित सोनवडे—वराड पूल या सर्व महत्वाच्या समस्या निवडणूक प्रचारादरम्यानच्या कालावधीत मतदारांसमोर मांडल्या. या सर्व आधारांवर शिवसेनेचे वैभव नाईक यांनी काँग्रेसचे नारायण राणे यांचा १०३७६ मतांनी पराभव करत विजय संपादन केला.

**कणकवली विधानसभा मतदारसंघ**

कणकवली विधानसभा मतदारसंघ चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार स्थापन झाला असून, सदर मतदारसंघात कणकवली, देवगड व वैभववाडी या संपूर्ण तिन्ही तालुक्यांचा समावेश होतो.

तक्ता क्र. ३

२००९—२०१४ कणकवली विधानसभा मतदारसंघातील राजकीय प्रभुत्व

| अ.क्र | निवडणुक वर्ष | विजयी उमेदवार | पक्ष | मते | पराभूत उमेदवार | पक्ष | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९ | प्रमोद जठार | भाजपा | ५७६५१ | रवींद्र फाटक | काँग्रेस | ५७६१७ |
| २ | २०१४ | नितेश राणे | काँग्रेस | ७४७१५ | प्रमोद जठार | भाजपा | ४८७३६ |

www.eci.gov.in

**२००९— विधानसभा निवडणुक**

तक्ता क्र. ३ वरुन असे दिसून येते की, कणकवली विधानसभा मतदारसंघात २००९ ते २०१४ या कालावधीत झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये अनुक्रमे भाजपा अणि काँग्रेस या राजकीय पक्षांचे वर्चस्व राहिलेले आहे. चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार कणकवली विधानसभा मतदारसंघाची निर्मिती झाली असून, सदर मतदारसंघात कणकवली, देवगड व वैभववाडी या संपूर्ण तिन्ही तालुक्यांचा समावेश करण्यात आला. या बदललेल्या रचनेनुसार

झालेल्या तिहेरी स्वरुपाच्या अत्यंत अटीतटीच्या लढतीत भाजपाचे प्रमोद जठार यांनी ५७६५१ (३९.९० टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. काँग्रेसचे रविंद्र फाटक यांना ५७६१७ (३९.८८ टक्के) मते मिळाली. तर जनसुराज्य शक्ती पक्षाचे कुलदिप पेडणेकर यांना २४५६६ (१७.००) मते मिळाली.

चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार स्थापन झालेल्या कणकवली विधानसभा मतदारसंघात भाजपाचे प्रमोद जठार निवडून येण्याचे कारण असे की, नव्याने स्थापन झालेल्या कणकवली विधानसभा मतदारसंघात अनेक उमेदवार निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. सदर निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून मुंबईस्थित काँग्रेसचे गटनेते रवींद्र फाटक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सतिश सावंत, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कुलदिप पेडणेकर हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. परंतु राज्य पातळीवर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निवडणुकपूर्व आघाडी झाली असल्यामुळे, आघाडरच्या जागावाटपामध्ये सदरची जागा काँग्रेस पक्षास देण्यात आली. काँग्रेस पक्षाने काँग्रेसचे नेते नारायण राणे यांचे समर्थक रवींद्र फाटक यांना उमेदवारी दिल्यामुळे राष्ट्रवादीचे कुलदिप पेडणेकर यांनी जनसुराज्यशक्ती पक्षामध्ये प्रवेश केला. कुलदिप पेडणेकर यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या मतांचे ध्रुवीकरण झाले. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीमधील मतभेदाचा फटका काँग्रेसचे उमेदवार रवींद्र फाटक यांच्या उमेदवारीस बसला. विधानसभा निवडणुकीपूर्वीच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील स्थानिक नेत्यांमध्ये आघाडीच्या उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू झालेली होती. या उमेदवारीच्या स्पर्धेचाच एक भाग म्हणून काँग्रेसचे रवींद्र फाटक, अशोक सावंत व जिल्हा बँकेचे अध्यक्ष अविनाश माणगावकर यांनी वसंत सरवणकर (फणसगाव), रवींद्र जोगल (शिरगाव) आणि वैशाली आरोंदेकर (आरोंदा) या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांना काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून घेतले. जिल्हा परीषदेमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकुण सहा सदस्यांपैकी या तीन सदस्यांचा स्वतंत्र गट स्थापन करून काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. जिल्हा परीषदेतील या बदलत्या राजकारणामुळे स्थानिक पातळीवरील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये मतभेद निर्माण झाले. आघाडी अंतर्गत असणाऱ्या या मतभेदांचा फटका सदर निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार रवींद्र फाटक यांच्या उमेदवारीस बसला.

२००४ च्या देवगड विधानसभा निवडणुकीत केवळ १०७२ मतांनी पराभूत झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कुलदिप पेडणेकर यांनी २००९ च्या सदर निवडणुकीमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीमधून बंडखोरी करत जनसुराज्यशक्ती पक्षाच्या माध्यमातून निवडणूक लढवली. राष्ट्रवादीचे बंडखोर व जनसुराज्य शक्तीचे उमेदवार असणारे कुलदिप पेडणेकर हे भंडारी समाजातील प्रमुख नेतृत्व असल्यामुळे सदर मतदारसंघातील भंडारी समाजाची मातृसंख्या असणाऱ्या अखिल भारतीय भंडारी महासंघाने सदर निवडणुकीत कुलदिप पेडणेकर यांना पाठींबा दिला. त्यामुळे आघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रमुख सामाजिक आधार असणारा भंडारी समाज २००९ च्या विधानसभा निवडणुकीत जनसुराज्यशक्ती पक्षाकडे वळला. कुलदिप पेडणेकर यांच्या बंडखोरीस राजू जठार, रवींद्र रावराणे, स्नेहलता चोरगे, सदा आचरेंकर, प्रकाश पारकर, नवीनचंद्र बांदिवडेकर, दत्तात्रय फोपे आणि अमित साळगावकर या प्रमुख राजकीय नेत्यांनी पाठींबा दिला. त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या पारंपारिक मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाले. सदर मतदारसंघातील वैभववाडी तालुक्यामध्ये काँग्रेसचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते व नारायण राणे समर्थक काँग्रेस कार्यकर्ते यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. त्याचबरोबर गतविधानसभा निवडणुकीमध्ये वैभववाडी तालुका हा जनसुराज्यशक्ती पक्षाचे अध्यक्ष विनय कोरे यांच्या पन्हाळा विधानसभा मतदारसंघामध्ये समाविष्ठ होता. त्यामुळे वैभववाडी तालुक्यामध्ये काँग्रेस— राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या मतांचे मोठ्या प्रमाणात ध्रुवीकरण झाले. त्यामुळे काँग्रेस पक्षाचा पारंपारिक पाठिराखा असणाऱ्या वैभववाडी तालुक्यामध्ये युतीचे प्रमोद जठार यांना १२८४ इतक्या मतांचे मताधिक्य प्राप्त झाले.

मुंबई मधील प्रमुख बांधकाम व्यावसायिक असणारे युतीचे उमेदवार प्रमोद जठार यांनी २००० सालापासून कणकवली विधानसभा मतदारसंघामध्ये विधानसभा निवडणुकीची पूर्वतयारी केलेली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असणाऱ्या प्रमोद जठार यांनी सदर मतदारसंघामध्ये सिंधुभूमी फौंडेशनची स्थापना करून सिंधुभूमी फौंडेशनच्या माध्यमातून हृदयविकार, किडनी, कॅन्सर अशा गंभीर स्वरूपाच्या आजारांच्या रूग्णांना मोफत उपचार उपलब्ध करून दिले. त्याचबरोबर सुनिता शांताराम एज्युकेशन ट्रस्ट, पार्थ स्टुडंट अकादमी, संगीत अकादमी, सिंधुभूमी डेअरी फार्म, सिंधुभूमी रूग्ण सेवा समिती, सिंधुभूमी क्रिडा समिती, महिला उत्कर्ष मंडळ, मोफत रूग्णवाहिकेची सोय, तरूणांसाठी रोजगार मार्गदर्शन केंद्र, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या सर्व बहुउद्देशीय संस्था आणि संघटनांच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख विकासकामे केली' या सर्व आधारांवर भाजपाचे प्रमोद जठार यांनी काँग्रेसचे रवींद्र फाटक यांचा केवळ ३४ मतांनी निसटता पराभव करत मतदारसंघ पुनर्रचनेनंतर निर्माण झालेल्या कणकवली विधानसभा मतदारसंघावर प्रथमच भाजपा पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित केले.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे नितेश राणे यांनी विजय संपादन केला. प्रामुख्याने काँग्रेस, भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांमध्ये झालेल्या बहुरंगी लढतीत काँग्रेसचे नितेश राणे यांनी ७४७१५ (४७.९१टक्के) मते मिळवत विजय संपादन केला. भाजपाचे प्रमोद जठार यांना ४८७३६ (३१.२५ टक्के) मते मिळाली. शिवसेनेचे सुभाष मयेकर यांना १२८६३ (८.२५ टक्के) मते मिळाली. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अतुल रावराणे यांना ८१९२(५.२६ टक्के) मते मिळाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत कणकवली विधानसभा मतदारसंघ प्रथमच काँग्रेस पक्षाकडे येण्याचे कारण असे की, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नारायण राणे यांचे सुपुत्र व स्वाभिमान संघटनेचे अध्यक्ष नितेश राणे यांना उमेदवारी देऊन रिंगणात उतरवले. चौथ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर निर्माण झालेल्या कणकवली विधानसभा मतदारसंघामध्ये १९९० पासून नारायण राणे यांचे कार्यक्षेत्र व प्रभावक्षेत्र असणाऱ्या कणकवली व मालवण तालुक्यांचा समावेश असल्यामुळे याचा लाभ नितेश

राणे यांच्या उमेदवारीस झाला. जुन्या मालवण विधानसभा मतदारसंघातून नितेश राणे यांनी स्वाभिमान संघटनेच्या माध्यमातून मोठया प्रमाणात युवकांचे मजबूत संघटन निर्माण केले होते. स्वाभिमान संघटनेच्या मजबूत व शिस्तबध्द संघटनात्मक बांधणीच्या बळावर नितेश राणे यांनी आक्रमक प्रचार केला. नितेश राणे यांनी नरवडे मध्यम प्रकल्पाचा प्रश्न, कुर्ली – घोणसरी प्रकल्पातील अपुर्ण कामे, वैभववाडी तालुक्यातील अरुण प्रकल्पाचा प्रश्न, देवगड तालुक्यातील कोर्ले – सातडी प्रकल्पाचा प्रश्न, मतदारसंघातील रस्त्यांची दुरावस्था आणि तारामुंबरी पुलाचा प्रश्न इत्यादी प्रश्न उपस्थित करुन प्रचारामध्ये आघाडी घेतली. त्याचबरोबर, नितेश राणे यांनी कणकवली विधानसभा मतदारसंघामध्ये गिनिज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये रेकॉर्ड झालेला महारोजगार मेळावा, सरपंच मार्गदर्शन शिबीरे, महिला प्रशिक्षण शिबीरे, दहीहंडी चे उपक्रम, पर्यटन वाढीसाठी सिंधुदुर्ग गाईडची संकल्पना, कणकवली शहरात उपलब्ध केलेली मोफत वाय फाय सुविधा यासारख्या अनेक लोकोपयोगी आणि लोकाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून नितेश राणे यांनी थेट जनसंपर्क निर्माण केलेला होता. या सर्व आधारावर काँग्रेसचे नितेश राणे यांनी भाजपाचे प्रमोद जठार यांचा २५९७९ इतक्या मताधिक्क्याने पराभव करत कणकवली विधानसभा मतदारसंघावर प्रथमच काँग्रेस पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित केले.

**संदर्भ सूची**

1) पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुर्नरचना', प्रतिमा प्रकाशन पुणे, मार्च २००९.
2) www.eci.gov.in
3) दै. पुढारी, (रत्नागिरी)
4) दै. पुढारी, (सिंधुदुर्ग)
5) केसरकर दिपक, मुलाखत, आमदार, सावंतवाडी विधानसभा.
6) कांबळी शंकर, मुलाखत, माजी आमदार, वेंगुर्ला विधानसभा.
7) राणे नारायण, मुलाखत, माजी आमदार, मालवण विधानसभा.
8) नाईक वैभव, मुलाखत, आमदार, मालवण विधानसभा.
9) गोगटे अजित, मुलाखत, माजी आमदार, देवगड विधानसभा.
10) पेडणेकर कुलदिप, मुलाखत, देवगड विधानसभा.
11) फाटक रविंद्र, मुलाखत, कणकवली विधानसभा.
12) राणे निलेश, मुलाखत, आमदार, कणकवली विधानसभा.
13) प्रमोद जठार, मुलाखत, माजी आमदार, कणकवली विधानसभा.